श्री संत गजानन महाराज जागतिक पारायण सोहळा बेलगाव येथे भक्तिभावात संपन्न >> पान 2

'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन >> पान 3

मातृतीर्थ सिंदखेड राजात जिजाऊभक्तांचा जनसागर ! >> पान 4

### सुविचार

आत्मा जिंकला की सर्व काही जिंकले. – भगवान महावीर

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 157 ■ मंगळवार, दि. 13 जानेवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



'धुरंधर'नंतर सौम्या रोमँटिक चित्रपटात

आतील पान

## लाडक्या बहिणींच्या पैशावरुन भाजपा-काँग्रेसमध्ये आरोप-प्रत्यारोप

## निवडणूक आयोगाकडून १४ जानेवारीला लाभ देण्यास मज्जाव

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :राज्यातील महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लाडक्या बहिणींचे पैसे थांबवण्याकरता काँग्रेसनं निवडणूक आयोगाला पत्र लिहिलं आहे. या योजनेच्या माध्यमातून महिलांना आमिष दाखवलं जात असल्याचं काँग्रेसनं म्हटलं आहे. लाडक्या बहीण योजनेच्या विरोधात कोर्टात जाणाऱ्या महाविकास आघाडीचा खरा चेहरा अशा कृतीमुळे वारंवार समोर येतोय, अशी काँग्रेसनं टीका केली.**

लाडक्या बहिणीचे पैसे निवडणूक संपल्यानंतर द्यावेत– महाराष्ट्र सरकारनं लाडकी बहिणी योजना नोव्हेंबर २०२५ ची रक्कम डिसेंबर २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात लाभार्थींच्या खात्यात जमा केली. राज्यातील महानगरपालिका निवडणुकीत मतदानाच्या आदल्या दिवशी डिसेंबर २०२५ आणि जानेवारी २०२६ या दोन महिन्याचे तीन हजार रुपये एकत्रित देण्याचा घाट सरकारनं घातला आहे. ही बाब एक कोटीहून अधिक महिला मतदारांना प्रभावित करेल. निवडणुकीच्या आदल्या दिवशी मतदान सत्तारूढ

पक्षाच्या उमेदवारांना करण्यास प्रवृत्त करणार आहे. एक प्रकारची सामूहिक सरकारी लाच आहे. आदर्श आचारसंहितेचा भंग या सरकारी कृतीनं होत आहे. लाडकी बहीण योजनेला आमचा विरोध नाही. मात्र, डिसेंबर २०२५ आणि जानेवारी २०२६ चे लाडक्या बहिणी योजनेचे पैसे निवडणुक संपल्यानंतर द्यावेत, असे निर्देश निवडणूक आयोगानं राज्य सरकारला द्यावे, असं काँग्रेसनं पत्रात म्हटलं आहे.अडथळे आणले तरी लाडक्या बहिणींना पैसे मिळणार– भाजपाचे सह–मुख्यप्रवक्ता अजित चव्हाण म्हणाले,'' लाडक्या बहिणींचे पैसे थांबवण्याकरता काँग्रेसनं निवडणूक आयोगाला पत्र दिल्याचं



कळतंय. लाडकी बहीण योजनेच्या विरोधात कोर्टात जाणाऱ्या महाविकास आघाडीचा खरा चेहरा अशा कृतीमुळे वारंवार समोर येतोय. महाराष्ट्रातल्या लाडक्या बहिणी याचं उत्तर काँग्रेसला दिल्याशिवाय राहणार नाही. काँग्रेसनं कितीही अडथळे आणले तरी लाडक्या बहिणींना त्यांच्या हक्काचे पैसे मिळणारच आहेत''.

लाडकी बहीण योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील २१ ते ६५ वयोगटातील महिलांना दरमहा १५०० रुपये थेट बँक खात्यात मिळतात. त्यामुळे त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळण्यास मदत होते. ही योजना महिलांना सक्षम करण्यासाठी आहे. त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची भूमिका मजबूत करण्यासाठी महायुती सरकारनं सुरू केली आहे. योजनेचा लाभ राज्यातील एक कोटीहून अधिक महिलांना मिळतो.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्य निवडणूक आयोगानं (एसईसी) मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांना सोमवारी अहवाल सादर करण्यास सांगितलं होतं. महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात आदर्श आचारसंहिता लागू असताना 'लाडकी बहीण' योजनेचा नियमित अथवा प्रलंबित लाभ देण्यास हरकत नसली, तरी जानेवारी महिन्याचा लाभ १४ जानेवारीपूर्वी देण्यास राज्य निवडणूक आयोगानं मज्जाव केला आहे. महानगरपालिका निवडणुकीसाठी राज्यभरातील २९ महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारीला मतदान होणार आहेत. तर निवडणुकीचे निकाल १६ जानेवारीला जाहीर होणार आहेत.

## कल्याण ते सीएसएमटी खास लोकल, प्रवाशांना होणार फायदा, पहिले फोटो आले समोर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईकरांसाठी लोकल ट्रेन हा रोजच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. दररोज लाखो प्रवासी कामानिमित्त मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईदरम्यान लोकलने प्रवास करतात. मात्र पीक अव्हरमध्ये लोकल गाड्यांमध्ये प्रचंड गर्दी असते. अनेक वेळा प्रवासी उघड्या दरवाज्यात लटकून प्रवास करताना दिसतात. त्यामुळे अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो आणि हा प्रवास अनेकदा जीवघेणाही ठरतो.

या सर्वांचा विचार करता रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. स्वयंचलित बंद दरवाज्यांची नॉन–एसी लोकल सुरू करण्याचा निर्णय आता प्रत्यक्षात येत आहे. अशा प्रकारची पहिली नॉन–एसी लोकल ट्रेन तयार झाली असून लवकरच तिच्या चाचणी फेऱ्या सुरू होणार आहेत.

मध्य रेल्वे मुंबईतील पहिली स्वयंचलित बंद दरवाज्यांची नॉन–एसी लोकल सुरू करण्याच्या तयारीत आहे. यामुळे उपनगरीय रेल्वे सेवेत मोठा बदल होण्याची शक्यता आहे. मुंब्रा येथे काही दिवसांपूर्वी झालेल्या भीषण अपघातानंतर हा निर्णय घेण्यात आला. त्या घटनेमुळे गर्दीच्या वेळी उघड्या दरवाज्यांमुळे निर्माण होणारे धोके पुन्हा एकदा समोर आले होते. या नवीन लोकल ट्रेनचे फोटो सर्वप्रथम एका 'एक्स'अर्थात(ट्विटर) युजरने शेअर केले. त्यानंतर प्रवाशांमध्ये या ट्रेनबाबत मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाली. फोटोंमध्ये बंद दरवाज्यांचे डबे स्पष्टपणे दिसत असून आतापर्यंत अशी सुविधा फक्त एसी लोकलमध्येच होती.

## टीम इंडियाचा क्रिकेटमध्ये मोठा पराक्रम!

वडोदरा: भारत आणि न्यूझीलंड क्रिकेट संघात इथं खेळल्या गेलेल्या पहिल्या वनडे सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतासमोर ३०१ धावांचं लक्ष्य ठेवलं. टीम इंडियानं ४९ षटकांत ६ गड्यांच्या मोबदल्यात हे लक्ष्य गाठलं. वनडे क्रिकेटमध्ये ३०० पेक्षा जास्त धावांचं लक्ष्य गाठण्याची ही २० वी वेळ आहे, तर जगातील इतर कोणत्याही संघानं १५ पेक्षा जास्त वेळा हे लक्ष्य गाठलेलं नाही. २० वेळा वनडे सामन्यात ३०० हून अधिक धावांचं लक्ष्य सहज गाठणारा भारत हा पहिला देश आहे. सध्या या बाबतीत कोणताही संघ भारताच्या जवळपासही नाही.

टीम इंडियाच्या नावावर मोठा विश्वविक्रम : वनडे क्रिकेटमध्ये ३०० पेक्षा जास्त धावांचं लक्ष्य गाठण्याचा विक्रम भारताच्या नावावर आहे. या यादीत इंग्लंड दुसऱ्या क्रमांकावर आहे, ज्यानं १५ वेळा वनडे सामन्यात ३०० पेक्षा जास्त धावांचा पाठलाग केला आहे. या यादीत ऑस्ट्रेलिया तिसऱ्या क्रमांकावर आहे, ज्यानं १४ वेळा हा पराक्रम केला आहे. पाकिस्तान यादीत चौथ्या क्रमांकावर आहे, ज्यांनी १२ वेळा ३०० पेक्षा जास्त धावांचं लक्ष्य गाठले आहे. तर न्यूझीलंड आणि श्रीलंका यांनी ११ वेळा ही कामगिरी केली आहे आणि यादीत ते संयुक्तपणे पाचव्या स्थानावर आहेत.

वनडे सामन्यांमध्ये ३०० पेक्षा जास्त धावांचा पाठलाग करणारे संघ : २० – भारत १५ – इंग्लंड १४ – ऑस्ट्रेलिया १२ – पाकिस्तान ११ – न्यूझीलंड/श्रीलंका

न्यूझीलंडविरुद्ध दुसरा सर्वोच्च पाठलाग : न्यूझीलंडविरुद्ध भारतानं यशस्वीरित्या पाठलाग केलेलं हे दुसरं सर्वोच्च लक्ष्य आहे.


## शेतरस्त्यांबाबत भूमीअभिलेख विभागाने घेतला मोठा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गावकुसाबाहेरील शेतरस्ते, पाणंद रस्ते आणि वहिवाटीच्या वाटांवरून होणारे वाद आता इतिहासजमा करण्याच्या दिशेने राज्य शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. अनेक गावांमध्ये नकाशावर रस्त्यांची नोंद असली, तरी प्रत्यक्षात त्या जागांवर अतिक्रमणे झाल्याने शेतकऱ्यांना शेतात जाण्या–येण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत होता. यामुळे शेजारी शेतकऱ्यांमध्ये वाद, तक्रारी आणि न्यायालयीन प्रकरणे वाढली होती. ही समस्या कायमची सोडवण्यासाठी भूमी अभिलेख विभागाने पाणंद व शेतरस्त्यांच्या हद्दनिश्चितीची व्यापक मोहीम सुरू केली आहे.

काय फायदा होईल?

या मोहिमेमुळे नकाशावर दाखवलेले रस्ते



प्रत्यक्षात जमिनीवर स्पष्ट होतील आणि त्या रस्त्यांच्या अधिकृत नोंदी थेट सातबारा उताऱ्यावर केल्या जाणार आहेत. सातबारावर रस्त्यांची नोंद झाल्याने भविष्यात अतिक्रमण, हद्दींचे वाद आणि वहिवाटीवरील अडथळे मोठ्या प्रमाणात कमी होतील, असा विश्वास महसूल व भूमी अभिलेख विभागाने व्यक्त केला आहे.

गेल्या वर्षी जमाबंदी आयुक्त डॉ. सुहास दिवसे यांनी नकाशात नसलेल्या मात्र प्रत्यक्षात अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची अधिकृत नोंद गाव नकाशा आणि दफ्तरात घेतली जाणार असल्याची घोषणा केली होती. राज्यात मूळ सर्वेक्षण आणि जमाबंदीचे काम १९३० पर्यंत पूर्ण झाले असले, तरी त्यानंतर तयार झालेल्या अनेक शिवरस्ते, पाणंद रस्ते, गाडीवाट आणि वहिवाटीचे मार्ग अधिकृत नोंदीत आले नव्हते. परिणामी, हे रस्ते कोणत्या गट नंबर किंवा सर्व्हे नंबरमधून जातात, याचा ठोस उल्लेख अभिलेखांमध्ये नव्हता.

आता या सर्व रस्त्यांची प्रत्यक्ष मोजणी करून नकाशांचे अद्ययावतीकरण सुरू करण्यात आले आहे. नकाशावर असलेल्या रस्त्यांवरील अतिक्रमणे काढण्याची कारवाईही हळूहळू सुरू झाली आहे. राज्य सरकारने मुख्यमंत्री बळीराजा >> पान २

## ऑनलाईन गेमिंगमुळे मित्रानेच केली मित्राची हत्या ; ६ महिन्यानंतर सापडला आरोपी मित्र

**मुंबई/प्रतिनिधी :** मित्राच्या हत्येप्रकरणी मुंबई पोलिसांनी २० वर्षांच्या तरुणाला अटक केली आहे. आरोपीने मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या पीएफ खात्यातून ३० हजार रुपये काढले. आणि ते ऑनलाईन गेमिंगवर खर्च केलेल्या पैशातून दोन मित्रांमध्ये वाद झाला वादातून मित्राने उचलेल टोकाचे पाऊल उचल्याची शक्यता आहे. आरोपी अंकित शाहू आणि राहुल कुमार योगेंद्र प्रसाद खरवर (वय २६) हे दोघे मित्र होते. दोघेही कुर्ला पश्चिम भागामध्ये राहत होते. खाजगी कंपनीमध्ये काम करणाऱ्या राहुलने पीएप खात्यातून पैसे काढण्यासाठी अंकितची मदत मागितली, कारण अंकित तंत्रज्ञानात पारंगत होता.

पीएफच्या पैशातले ३० हजार रुपये अंकितने राहुलच्या पीएफ खात्यातून स्वत:च्या खात्यात ट्रान्सफर केले. आपल्या संमतीशिवाय अंकितने हे पैसे काढल्याचं राहुलला समजलं, तेव्हा त्याने पैसे परत मागितले. यानंतर अंकितने राहुलला युपीआय व्यवहाराचा स्क्रीनशॉट पाठवून पैसे परत केल्याचं सांगितलं. राहुलने मात्र अंकितने पैसे परत दिले नसल्याचा दावा मित्रांकडे केला.

## ६८७१ सरकारी कर्मचाऱ्यांची नोकरी जाणार?

### भोवणार निवडणुकीसंदर्भातील तो गोंधळ? आदेश जारी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** निवडणुकीसंदर्भातील तयारीमध्ये टाळाटाळ केल्याप्रकरणी आणि बेजबाबदार वागणुकीप्रकरणी तब्बल ६ हजारांहून अधिक कर्मचारी अडचणीत येण्याची शक्यता आहे. महापालिका निवडणूक प्रक्रियेत नियुक्त कर्तव्ये पार पाडण्यास गैरहजर राहिलेल्या एकूण ६ हजार ८७१ अधिकारी व कर्मचाऱ्यांना महापालिकेकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. यापैकी २ हजार ३५० अधिकारी व कर्मचारी निवडणूक प्रक्रियेत सहभागी झाले आहेत, तर वारंवार सूचना देऊनही प्रशिक्षण, प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया अथवा नेमून दिलेल्या निवडणूक कर्तव्यामध्ये हजर न राहणाऱ्या ४ हजार ५२१ जणांना निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महापालिकेतील कर्मचारी म्हणून नियुक्ती करुनही याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्यांविरोधात १२ जानेवारीपासून म्हणजेच आजपासून कारवाई करण्यात येणार आहे.

अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध आजपासून पोलीस कारवाई केली जाणार आहे. अगदी नोकरी जाण्याची वेळ या कर्मचाऱ्यांवर येणार नाही. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या निर्देशानुसार हा कठोर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. महापालिकेच्या मुख्यालयात पार पडलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. नियुक्त करण्यात आलेल्या >> पान २

## अनोखी कलाकृती! कपड्यांपासून बनवलं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं ६ फूट लांबीचं पोर्ट्रेट

ब्रह्मपूर (ओडिशा) : ब्रह्मपूरमधील तरुण फॅशन डिझायनर्सनी जुन्या आणि टाकाऊ कपड्यांचा वापर करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं एक आकर्षक पोर्ट्रेट तयार केलं आहे. या सुंदर कलाकृतीसाठी १५ दिवसांचं कष्टाचे काम आणि हातानं शिवणकाम करण्यात आलं. येत्या काही दिवसांत हे पोर्ट्रेट ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांच्यामार्फत पंतप्रधानांना पाठवण्याची योजना आहे.

फॅब्रिक ऑफ रिस्पेक्ट : ब्रह्मपूर येथील जेडी इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांनी टाकाऊ कापड्यांपासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं हे पोर्ट्रेट तयार केलं आहे, ज्याला ''फॅब्रिक ऑफ रिस्पेक्ट'' असं नाव देण्यात आलं आहे. हे पोर्ट्रेट ६ फूट उंच आणि ५ फूट रुंद आहे. ब्रह्मपूरचे आमदार के. अनिल कुमार यांच्या




उपस्थितीत त्याचे औपचारिक अनावरण करण्यात आले. यावेळी आमदार म्हणाले की, ''पुनर्वापर केलेल्या जुन्या कपड्यांपासून पंतप्रधानांचे असे पोर्ट्रेट तयार करण्याची देशात ही पहिलीच वेळ आहे.''

शहरातून कपड्यांचे लहान–लहान तुकडे एकत्र करण्यात आले : फॅशन इन्स्टिट्यूटचे संचालक आशिष रंजन सबत यांच्या मते, ''फॅब्रिक ऑफ रिस्पेक्ट'' असं नाव असलेलं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं हे पोर्ट्रेट तयार करण्यासाठी ब्रह्मपूर शहरातून कपड्यांचे लहान–लहान तुकडे एकत्र करण्यात आले. त्यानंतर त्याचं हातानं शिवणकाम करण्यात आलं. दरम्यान, पंतप्रधान मोदींवरील प्रेम आणि आपुलकीतून हा प्रयत्न करण्यात आला आहे.

तीन टीमचे समन्वय : हे खास पोर्ट्रेट तयार करण्याची प्रक्रिया १४ डिसेंबर २०२५ रोजी सुरू झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं हे पोर्ट्रेट तयार करण्यासाठी इन्स्टिट्यूटद्वारे तीन टीम तयार करण्यात आल्या. पहिल्या टीमनं शहरातील विविध शिवणकाम केंद्रांमधून जुन्या कपड्यांचे लहान–लहान तुकडे गोळा केले. दुसऱ्या टीमनं ते तुकडे सुंदर असे कापले, व्यवस्थित केले आणि त्यावर इस्त्री केली. त्यानंतर तिसऱ्या टीमनं कापलेले कपड्यांचे तुकडे हातानं शिवण्याची प्रक्रिया सुरू केली. अशा प्रकारे, १५ दिवसांच्या कठोर परिश्रमानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हे सुंदर पोर्ट्रेट तयार झाले.


पोर्ट्रेट तयार करण्याची प्रक्रिया : इन्स्टिट्यूटच्या संचालकांनी पंतप्रधानांचे कापडी चित्र तयार करण्याचा प्रस्ताव दिल्यानंतर, विद्यार्थ्यांनी काम सुरू केले, दिवसातून ८ ते १० तास काम केले. हे करण्यासाठी, सर्वात आधी एक कॅनव्हास तयार करण्यात आला, ज्यावर पंतप्रधानांच्या प्रतिमेची रूपरेषा (आउटलाइन) काढली गेली. कपड्यांच्या तुकड्यांना रंगांनुसार विभागण्यात आले. विद्यार्थ्यांच्या टीमनं कोणते कपडे कुठं ठेवावेत, याची योजना आखली. कपड्यांचे तुकडे लहान पिक्सेल आकाराच्या तुकड्यांमध्ये कापले गेले आणि नंतर ते प्रतिमेत समाविष्ट केले गेले. ते पूर्णपणे हातानं शिवून तयार करण्यात आले. गोंद किंवा रंगांचा वापर न करता. या पोर्ट्रेटमध्ये वापरलेले कापड साध्या कापडांपासून ते >> पान २



## आर्थिक विषमता तीव्र जाणवतेय...

पुढील महिन्यात निर्मला सीतारामन या २०२६–२७ चा केंद्रीय अर्थसंकल्प संसदेत सादर करून १०व्या वेळी असा बहुमान मिळवणाऱ्या पहिल्या अर्थमंत्री बनतील. पण यावेळी बऱ्याच आव्हानांना तोंड देण्याची तयारी करावी लागणार अशी चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. एकीकडे आर्थिक विषमता फार जोमाने वाढत आहे तर दुसरीकडे बेकारीचा प्रश्न तीव्र होत आहे. झोमॅटो, स्वीगी सारख्या झटपट व्यापाराच्या कंपन्यांमुळे निर्माण झालेल्या गिग इकॉनॉमी च्या मर्यादादेखील दिवसेंदिवस स्पष्ट होत आहेत. जमेची बाजू अशी की यावर्षी विकास दर हा ७.४ टक्के राहील असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला गेलेला आहे. जग सध्या ज्या उलथापालथीतून जात आहे तेव्हा हा बराच आश्वासक आहे हे खरे. पण उद्या काय घडणार याविषयीच निश्चिती नसेल तर कसे होणार हा शंकेचा सूर गैरलागू आहे असे नव्हे. भारताची अर्थव्यवस्था जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे अशी आपण आपली पाठ कितीही थोपटत असलो तरी त्याचबरोबर या भीमकाय देशातील नानाविध प्रश्नांनी तिला भेडसावले आहे, हे जरा खोलात बघितले तर दिसू लागले आहे. असूनी मनोहर तरी असे असले तरी या अर्थव्यवस्थेची खोली आणि बाहेरून अचानक संकटे आली तर ती कशी निभावून नेणार याविषयी प्रश्न उपस्थित झाले आहेत. देशातील ८० कोटी लोकांना उदर भरणाकरता अन्नधान्य वर्षभर मोफत दिले जाते असे नेहमी सरकारच सांगत असते. त्यावरून गावकुसाबाहेर देखील एक फार मोठं जग आहे, असेच दिसते. गेल्या अर्थसंकल्पात इनकम टॅक्सधारकांना भली मोठी सूट देऊन मोदी सरकारने मध्यम वर्गाला आणि नोकरदार पेशाला खुश करण्याचा प्रयत्न केला होता. तीन महिन्यांपूर्वी मोदी सरकारने बऱ्याच वस्तूंवरील जीएसटी (वस्तू आणि सेवा कर) चे दर घटवून आणि त्याची प्रसारमाध्यमांवरून दवंडी पिटवून जणू सण साजरा केला होता. त्यानंतरच्या दिवाळीच्या महिन्यात काय घडले होते. या करातून सरकारला १.७४ लाख कोटी आमदनी झाली होती. ती अगोदरच्या महिन्यापेक्षा फारशी जास्त नव्हती. याचा अर्थ सध्याच्या कठीण काळात दिवाळी असली तरी लोक ऋण काढून सण साजरा करत नाहीत. त्यातील थोडा पैसा साठवत देखील आहेत असा होतो. अलीकडील काळात कोविडने त्रस्त केलेल्या समाजाला थोडी उसंत हवी आहे. त्याने अगोदर नोटबंदी देखील झेललेली आहे. टाळी पिटली आहे. थाळी वाजवली आहे. विकसित भारत करण्याकरता सरकारकडून अर्थव्यवस्थेमध्ये प्रसंगी कर्ज काढून देखील प्रचंड गुंतवणूक होत आहे. त्यातून मोठमोठे रस्त्यांचे जाळे, मोठमोठे प्रकल्प हाती घेतले जात आहेत. नवनवीन रेल्वेमार्ग, नवनव्या ट्रेन्स सुरु होत आहेत, वीज प्रकल्प उभे राहात आहेत आणि बरेच काही होत आहे. पण खासगी क्षेत्रातील गुंतवणूक अतिशय कमी आहे. याचा अर्थ सरकारने जी वेगवेगळी धोरणे आखली आहेत आणि आर्थिक, सामाजिक, राजकीय बाबतीत जी नीती तयार केलेली आहे त्यावर खासगी उद्योजकांचा तेव्हढा विश्वास नाही, असाच होतो. व्यापारी आणि उद्योगपती मंडळी फारशी बोलत नसतात. ती न बोलून काम करणारी मंडळी असतात. भारतातील बरेच उद्योजक मायदेशी गुंतवणूक करत नसून परदेशी करत आहेत हे देखील दिसून येत आहे. गेल्या काही वर्षात काही लाख श्रीमंत आणि अतिश्रीमंत मंडळींनी देशाला राम राम ठोकत विदेशी नागरिकत्व घेतलेले आहे. नवीन योजना आणण्याकरता तसेच वाढीव पैसा खर्च करण्याकरता अर्थमंत्र्यांना फार कमी वाव आहे. आवकच फारशी नसताना जावक कशी चालायची? फक्त नव्या नोटा छापून जावक वाढवली तर आर्थिक शिस्त बिघडेल आणि बऱ्याच प्रयत्नांनी आळा घातलेल्या चलनवाढीचा फुगा फुगेल. कालचा दिवस बरा होता असे म्हणण्याची वेळ येईल. पूर्वीच्या सरकारांना कितीही नावे ठेवली तरी त्याने केवळ प्रचारच होतो. अर्थव्यवस्थेला बळकटी येत नाही. गैरभाजप राज्ये ही केंद्र सरकार आपल्याशी सापत्नभाव करत आहे आणि मुबलक साधने उपलब्ध करून देत नाही अशी वारंवार तक्रार करत आहेत. योजनांवर जास्त पैसा खर्च होत नाही पण केंद्राच्या त्याबाबतीतील प्रचारावरच जास्त पैसे खर्च होतात, असे आरोप वाढत आहेत. भारत हा जगातील सर्वात वेगवान अर्थव्यवस्था आहे असा दावा वारंवार सरकार करत असली तरी आंतरराष्ट्रीय नाणे निधी (आयएमएफ) ने त्याबाबत बरेच प्रश्न उपस्थित केलेले आहेत, असे जाणकार सांगतात. जर भारत एव्हढ्या झपाट्याने प्रगती करत असेल तर याबाबतची त्याची वेगवेगळी मानके जुळून यायला हवीत पण तसे होताना दिसत नाही. ज्याप्रमाणात रोजगाराच्या संधी वाढायला पाहिजेत तेव्हढ्या अजिबात वाढत नाहीत, असेच दिसत आहे. आकड्यांबाबत सरकारचे दावे व अपारदर्शिता खरोखरच जमिनीवर काय स्थिती आहे असे दाखवत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. देशाची अर्थव्यवस्था सध्या नाजूक अवस्थेत आहे आणि यावर्षी रोजगाराच्या मुद्यावर सरकारला भरीव काम करावे लागेल, असे विरोधक म्हणत आहेत. येत्या बजेटमध्ये विकासाला चालना देणाऱ्या आणि देशातील उद्योजकांना आकृष्ट करणाऱ्या योजना सादर करण्यात अर्थमंत्री किती यशस्वी होतात आणि सरकार सर्वांना बरोबर घेऊन जाण्यासाठी कटिबद्ध आहे याबाबत किती विश्वास निर्माण करते, त्यावर अर्थव्यवस्थेच्या इंजिनाची गती किती राहणार ते अवलंबून आहे.

# श्री संत गजानन महाराज जागतिक पारायण सोहळा बेलगाव येथे भक्तिभावात संपन्न







**दैनिक आपला विदर्भ**

**■ गजानन जाधव**

**बेलगाव :** बेलगाव येथे दिनांक ११ जानेवारी रोजी श्री संत गजानन महाराजांच्या कृपाशीर्वादाने एक दिवसीय जागतिक दिन पारायण सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्यात श्री संत गजानन महाराजांच्या 'विजय ग्रंथाचे' सामूहिक पारायण करण्यात आले.

या पवित्र पारायण सोहळ्यात १०१ महिला व पुरुष भक्तांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सकाळी फराळ व पाण्याची सेवा सचिन देवराव वानखेडे यांनी प्रेमपूर्वक केली, तर दुपारच्या भोजनाची व्यवस्था मनोज विश्वासराव वानखेडे यांच्या वतीने करण्यात आली.

श्री संत गजानन महाराज सेवा समितीच्या वतीने वर्षभर विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम राबवले जातात. विदर्भाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र शेगाव येथून प्रेरणा घेऊन दरवर्षी एक दिवसीय जागतिक दिन पारायण सोहळ्याचे आयोजन विविध ठिकाणी करण्यात येते. त्याच परंपरेनुसार बेलगाव येथेही हा सोहळा मोठ्या भक्तिभावात व उत्साहात पार पडला. संपूर्ण परिसर "श्री गजानन महाराज की जय" च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता. भक्ती, श्रद्धा आणि सेवाभाव यांचा सुंदर संगम साधणारा हा जागतिक पारायण सोहळा बेलगावकर भक्तांसाठी आध्यात्मिक समाधान देणारा ठरला.

पान १ वरून...

## शेतरस्त्यांबाबत भूमीअभिलेख

शेत किंवा पाणंद रस्ते योजना लागू केली असून, या योजनेअंतर्गत शेतरस्त्यांचे मजबुतीकरण आणि दुरुस्ती केली जात आहे. त्याच योजनेचा भाग म्हणून पाणंद रस्त्यांच्या हद्दनिश्चितीचे काम हाती घेण्यात आले आहे. सध्या राज्यातील ६६ पाणंद रस्त्यांच्या हद्दनिश्चितीची प्रक्रिया सुरू असून त्यासाठी आवश्यक पूर्वतयारी पूर्ण करण्यात आली आहे. गाव नकाशावरील विविध रस्त्यांचे जीआयएस तंत्रज्ञानाच्या आधारे अद्ययावतीकरण करण्यात आले आहे. पायवाट, गाडीवाट, शेतरस्ते आणि हद्दीचे रस्ते यांचे अक्षांश-रेखांशासह डिजिटल नकाशे तयार करण्यात आले आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष जागेवर रस्त्यांची सीमा निश्चित करणे अधिक सोपे आणि वेगवान होणार आहे.

भूमी अभिलेख विभागाचे उपसंचालक कमलाकर हट्टेकर यांनी सांगितले की, ''रस्त्यांच्या नोंदी नकाशापाठोपाठ सातबारावर केल्याने अनेक वर्षांचे वाद मिटण्यास मदत होईल. कोणता रस्ता कोणत्या गट नंबरमधून जातो, याची स्पष्ट नोंद झाल्याने शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण होईल.'' प्रत्येक जिल्ह्यात तहसीलदारांकडे पाणंद रस्ते, शेतरस्ते किंवा पायवाटांबाबत तक्रारी आल्यास त्यावर तातडीने कार्यवाही केली जाणार आहे. अतिक्रमणमुक्त रस्ते तयार झाल्यानंतर त्या रस्त्यांची नोंद संबंधित शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर केली जाईल. यामुळे दोन खासगी जमिनींतून जाणाऱ्या रस्त्याचा अधिकृत उल्लेख होणार असून, दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांची वहिवाट कायमस्वरूपी सुनिश्चित होणार आहे. भूमी अभिलेख विभागाच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील दैनंदिन संघर्ष कमी होऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

## ६८७१ सरकारी कर्मचाऱ्यांची

अधिकारी, कर्मचाऱ्यांचे मतदान प्रक्रियेविषयीचे पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. निवडणूक कर्तव्यासाठी नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणास उपस्थित राहणे बंधनकारक होते. जे अधिकारी आणि कर्मचारी प्रशिक्षण सत्रास गैरहजर राहिले आहेत, त्यांना १० जानेवारीला अंतिम संधी देण्यात आली होती.

११ जानेवारीपासून निवडणूक कायद्यांतर्गत कडक शिस्तभंगात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा डॉ. अश्विनी जोशी यांनी दिला होता. त्यानुसार आजपासून कारवाईस सुरुवात करण्यात आली आहे.

कारवाई करण्यात आलेले कर्मचारी कुठे काम करतात?

महापालिकेकडून ज्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे, त्यामध्ये महानगरपालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसह राष्ट्रीय बँक, बेस्ट, बीएसएनएल, एचपीसीएल, विमा कंपनी, एलआयसी, म्हाडा, एमटीएनएल, टपाल खाते, रेल्वे, आरसीएफ, नाबार्ड या शासकीय/निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम आदींतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या सर्व कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा नोंद, दंडात्मक कारवाई तसेच विभागीय शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

ठाणे महापालिका निवडणुकीसाठी मतदान केंद्रांवरील कामकाजाकरिता निवडणूक विभागाकडून बजावण्यात आलेले आदेश नाकारल्याप्रकरणी ठाण्यातील रेन्बो इंटरनॅशनल या शाळेच्या मुख्याध्यापिकेवर राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार गुन्हा दाखल केल्याची माहिती ठाणे महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौरभराव यांनी दिली. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी मतदान केंद्रावर विविध शासकीय-निमशासकीय आस्थापना तसेच खासगी शाळांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक विभागाचे कर्मचारी ठाण्यातील रेन्बो इंटरनॅशनल शाळेत नियुक्तीचे आदेश बजावण्यासाठी गेले असता मुख्याध्यापिका विमलेश सिंधू यांनी आदेश स्वीकारण्यास नकार दिला. या प्रकरणी रेन्बो इंटरनॅशनल शाळा आणि मुख्याध्यापिकेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अनोखी कलाकृती! कपड्यांपासून

पारंपारिक संबलपुरी वस्त्रांपर्यंत आहे.

टीमवर्कमुळं हे यश मिळालं : विद्यार्थिनी सुप्रभा पात्रा हिनं सांगितलं की, "खूप प्रयत्नांनंतर आम्हाला अखेर यश मिळालं. आमच्या टीमवर्कमुळं हे यश मिळालं. याद्वारे आम्हाला इतर कलाकारांना संदेश द्यायचा होता की टाकाऊ कपड्यांपासूनही अशी सुंदर चित्रं बनवता येतात." तर विद्यार्थी रोशनी नायक म्हणाली, "आम्ही गेल्या १५ दिवसांपासून ते बनवण्याचा प्रयत्न करत होतो. आमच्या इन्स्टिट्यूटनं ते बनवण्याचा प्रस्ताव ठेवला होता. विद्यार्थी आणि शिक्षकांनी ते बनवण्यासाठी खूप प्रयत्न केले आहेत. ते बनवल्यानंतर आम्ही सर्व विद्यार्थी खूप आनंदी आहोत."

## 'धुरंधर'नंतर सौम्या रोमॅंटिक चित्रपटात

'धुरंधर' चित्रपटातील भूमिकेमुळे चर्चेत आलेली भाभीजी घर पर है मधील अभिनेत्री सौम्या टंडन आता दिग्दर्शक सूरज बडजात्या यांच्या आगामी रोमॅंटिक 'ड्रामा ये प्रेम मोल लिया'मध्ये दिसणार आहे. या चित्रपटात प्रमुख भूमिकांमध्ये आयुष्मान खुराणा आणि शर्वरी झळकणार आहेत. 'धुरंधर'मध्ये सौम्याने उल्फत रहमान ही भूमिका साकारली आहे, ती विशेष गाजली. अभिनेता अक्षय खन्ना यांच्या पत्नीच्या भूमिकेत तिने संयत अभिनय सादर केला. याच अभिनयाच्या जोरावर आता त्यांना सूरज बडजात्या यांच्या चित्रपटात महत्त्वाची भूमिका मिळाल्याचे मानले जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, 'ये प्रेम मोल लिया'मधील सौम्या टंडनची भूमिका केवळ पूरक स्वरूपाची नसून कथानकाला भावनिक वजन देणारी असेल. त्यामुळे हा चित्रपट त्यांच्या कारकिर्दीतील पुढील महत्त्वाचा टप्पा ठरण्याची शक्यता आहे.

'हम आपके हैं कौन', 'हम साथ-साथ हैं' आणि 'विवाह'सारख्या चित्रपटांमधून कुटुंबकेंद्रित, नातेसंबंधांवर आधारित कथा मांडणारे सूरज बडजात्या या चित्रपटातून पुन्हा एकदा आपल्या परिचित शैलीत परतताना दिसणार आहेत. दूरदर्शन, चित्रपट आणि ओटीटी प्लॅटफॉर्म अशा तिन्ही माध्यमांत यशस्वी वाटचाल करणार्या सौम्याने आपल्या बहुआयामी अभिनय क्षमतेचा ठसा उमटवला आहे. या नवीन चित्रपटाबाबत अधिकृत घोषणा आणि पुढील तपशीलांची चाहत्यांना उत्सुकता लागून राहिली आहे.

# धर्म, मानवता व स्वातंत्र्याचे प्रतीक श्री गुरु तेगबहादुर साहिब जी !

शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेगबहादुर साहिब जी हे धर्म, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपले सर्वस्व अर्पण करणारे महान गुरु होते. शीख इतिहासातच नव्हे तर संपूर्ण भारतीय इतिहासात त्यांना 'हिंद-दी-चादर' म्हणून सन्मानाने ओळखले जाते.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचा जन्म पंजाबमधील अमृतसर येथे वैशाख कृष्ण पंचमी या पवित्र तिथीला झाला. बालपणी त्यांना त्यागमल या नावाने ओळखले जात होते. लहानपणापासूनच ते निर्भय, शूर, विचारशील व उदार स्वभावाचे होते. त्यांचे शिक्षण मीरी-पीरीचे स्वामी, गुरु-पिता श्री गुरु हरगोबिंद साहिबजी यांच्या छत्रछायेत झाले.

अवघ्या १४ व्या वर्षी त्यांनी वडिलांसोबत परकीय आक्रमणाविरुद्ध लढा देत पराक्रम गाजवला. त्यांच्या शौर्याने प्रभावीत होऊन गुरु हरगोबिंद साहिबजी यांनी त्यांना 'तेगबहादुर' हे नाव दिले, ज्याचा अर्थ 'तलवारीचा धनी' असा होतो. या काळात त्यांनी गुरुबाणी, धर्मग्रंथांचे अध्ययन तसेच अस्त्र-शस्त्रविद्या व घोडेस्वारीचे शिक्षण आत्मसात केले.

शीख (सिख) धर्माचे आठवे गुरु श्री गुरु हरिकृष्णजी यांची आत्मज्योति विसर्जित झाल्या नंतर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांची नववे गुरु म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी



आपल्या गुरुपदाच्या कार्यकाळात संस्कृती रक्षक, सामाजिक समता, मानवी मूल्ये व धार्मिक स्वातंत्र्य यासाठी अखंड प्रयत्न केले. १७ व्या शतकामध्ये तत्कालिन शासन कर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुध्द आवाज उठवून मानवी हक्कांसाठी बलिदान देवून भारताच्या सांस्कृतिक व आध्यामिक अस्मितेचे त्यांनी रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शीख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक दृढ (मजबुत) झाली. त्यांच्या या त्यागामुळेच ते खऱ्या अर्थाने 'हिंद-दी-चादर' ठरले.

गुरु तेगबहादुर साहिब जी यांच्या शिकवणीत क्षमा, करुणा, समता, प्रेम व मानवतेचा संदेश आहे. चुका स्वीकारण्याचे धैर्य असल्यास क्षमा शक्य आहे, हा त्यांचा विचार आजही मार्गदर्शक आहे. त्यांनी १५ रागांमध्ये रचलेले ११६ शबद (गुरुबाणी) श्री गुरु ग्रंथसाहिबमध्ये संकलित असून ते आध्यात्मिक प्रेरणेचा अमूल्य ठेवा आहे.

श्री गुरु तेगबहादुर साहिब जी यांचे सन २०२५ हे ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहिती व्हावा तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले योगदान स्मरण होण्यासाठी नांदेड येथे दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात निशान साहिबांना चोला अर्पण करण्याची सेवा, श्री अखंडपाठ साहिब, कीर्तन, धार्मिक दीवान भरवण्यात येणार आहे. तसेच देशातील नामवंत रागी जत्थ्यांकडून शबद गायन होणार आहे.

त्यांच्या अद्वितीय बलिदानाच्या स्मरणार्थ यावर्षी ३५० वा शहीदी समागम वर्ष साजरा होत असून त्या निमित्ताने राज्यात तीन ठिकाणी श्री तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम शताब्दी कार्यक्रम साजरा करण्यात येत आहे. यापुर्वी नागपूर येथे हा कार्यक्रम ७ डिसेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात आला. आता दिनांक २४ व २५ जानेवारी रोजी नांदेड येथे राज्य शासनाच्या अल्पसंख्याक विभाग, हिंद-दी-चादर श्री गुरु तेगबहादुर साहिब जी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच शीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे मामा चौक येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मोदी मैदानावर या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. नांदेडच्या या कार्यक्रमानंतर नवी मुंबई येथे १८ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी हिंद-दी-चादर या कार्यक्रमाचे मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य आयोजन करण्यात येणार आहे.

या पवित्र प्रसंगी सिख धर्मीय बांधवांसह सर्व धर्मीय भाविक गुरु घरात उपस्थित राहून मत्था टेकणार असून श्रद्धा, भक्ती व ऐक्याचे दर्शन घडणार आहे. धर्म, मानवता व धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या या महान गुरूंच्या स्मरणार्थ नांदेड येथे होणारा हा शहीदी समागम समाजाला सत्य, त्याग व साहसाचा संदेश देणारा ठरणार आहे.

**– अलका पाटील**
**उपसंपादक, जिल्हा माहिती कार्यालय, नांदेड**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन

## ▮ नागरिकांनी सोशल मीडियावर या कार्यक्रमाशी संबंधीत पोस्ट करण्याचे आवाहन
## ▮ शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे सन २०२५-२६ हे ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास, धर्मासाठी दिलेले महान बलिदान तसेच समाजासाठी केलेले अमूल्य कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे या उद्देशाने नांदेड येथे ऐतिहासिक, भव्य व दिव्य ''हिंद-दी-चादर'' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

नांदेड येथे असर्जन भागातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मैदानावर २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या प्रसंगी मा.मुख्यमंत्री महोदय विविध स्पर्धांमध्ये विजयी ठरलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करणार आहेत.

शैक्षणिक उपक्रम

या कार्यक्रमाच्या व्यापक प्रचार व प्रसिद्धीसाठी जिल्ह्यातील सर्व शाळा, आश्रमशाळा व महाविद्यालयांमध्ये खालील शैक्षणिक व जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत.

जनजागृती मोहीम १५ ते २३ जानेवारी २०२६ दरम्यान प्रभातफेरीचे आयोजन. २५ जानेवारी २०२६ पर्यंत शाळांमधील परिपाठाच्यावेळी श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या कार्यावर आधारित गीतांचे सादरीकरण करण्याबाबत सूचना निर्गमित,डॉक्युमेंटरी प्रदर्शन, घोषवाक्याचा प्रसार : ''हिंद दी चादर- श्री गुरु तेग बहादुर''

तालुकास्तरीय स्पर्धा (१५ ते १७ जानेवारी २०२६)

चित्रकला स्पर्धा, गायन स्पर्धा, निबंध स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा ई.

जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

दिनांक : २० जानेवारी २०२६

ठिकाण : गुरुग्रंथसाहेबजी भवन, सचखंड पब्लिक स्कूलजवळ हिंगोली गेट, नांदेड

विद्यार्थ्यांना विविध स्पर्धांमध्ये सहभागाची संधी असून, जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना मुख्य कार्यक्रमाच्या वेळी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात येईल.

नागरिकांसाठी आवाहन

नागरिकांनी सोशल मीडियावर #hinddichadar350 या हॅशटॅगचा वापर करून कार्यक्रमाशी संबंधित पोस्ट शेअर कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. कार्यक्रमासंबंधी सविस्तर माहिती gurutegbahadurshahidi.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.



## विवाहित पुरुषांसोबत संबंध ठेणाऱ्या महिलांना, हायकोर्टाचा निर्णय; पुरुषांना दिलासा



**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई उच्च न्यायालयाने विवाहित पुरुषांसोबत संबंध ठेणाऱ्या महिलांसंदर्भात एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय मागील आठवड्यामध्ये दिला आहे. विवाहित पुरुषासोबत जाणीवपूर्वक संबंध ठेवणाऱ्या महिलेला 'घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५' अंतर्गत कोणताही दिलासा मिळू शकत नाही, असा महत्त्वाचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने शुक्रवारी दिला.

अशा प्रकरणांत पोटगी किंवा आर्थिक दिलासा दिल्यास...

न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या एकसदस्यीय खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. विवाहित पुरुषांसोबत ठेवलेला अशा प्रकारचा संबंध हा 'लग्नासारख्या स्वरूपाचा संबंध' ठरत नाही. अशा प्रकरणांत पोटगी किंवा आर्थिक दिलासा दिल्यास त्या पुरुषाच्या कायदेशीर पत्नी व मुलांवर विपरीत परिणाम होईल, असेही न्यायालयाने नमूद केले. याचिकाकर्ती इंजिनियर महिलेचे २००१ पासून विवाहित प्राध्यापकासोबत संबंध होते. पहिले पत्नी असताना दोघांनी २००५ मध्ये विवाह केला होता. महिलेला त्या पुरुषाचे लग्न व पहिल्या विवाहातून मूल असल्याची माहिती आधीपासूनच होती. त्यामुळे या संबंधाला 'कायदेशीर मान्यता' नाही, असं न्यायालयाने म्हटलं आहे.

२००८ मध्ये या दोघांना एक मुलगा झाला. संबंध बिघडल्यावर तिने पुण्यातील दंडाधिकारी न्यायालयात भारतीय दंड संहिता व घरगुती हिंसाचार कायद्यान्वये तक्रार दाखल केली. २ मार्च २०१५ मध्ये न्यायालयाने त्या प्राध्यापकाला दरमहा २८,००० रुपये पोटगी व ५ लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश देण्यात आले. ३ जुलै २०१६ मध्ये पुणे सत्र न्यायालयाने हा आदेश रद्द केला. त्यानंतर महिलेने उच्च न्यायालयात धाव घेतली होती. आता न्यायालयाने या महिलेच्या बाजूने निकाल दिला आहे.

काही दिवस एकत्र घालवल्याने...

केवळ संयुक्त मालमत्ता खरेदी करणे किंवा काही दिवस एकत्र घालवणे यामुळे घरगुती हिंसाचार (प्रतिबंध) कायद्यान्वये 'लग्नासारख्या स्वरूपाचा संबंध' सिद्ध होत नाही. 'हा संबंध 'लग्नासारख्या स्वरूपाच्या' नात्यासाठी आवश्यक ते निकष व अटी पूर्ण करत नाही, असा निष्कर्ष हायकोर्टाने काढला आहे. असा संबंध लग्नासारखा संबंध सिद्ध होत नाही. तो लग्नाच्या अटीही पूर्ण करत नाही, असं न्यायालयाने निकाल देताना नमूद केलं आहे.

'घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५' अंतर्गत विवाहित महिलांना संरक्षण दिलं जातं. या कायद्याअंतर्गत विवाहित महिला पतीपासून विभक्त होत असेल तर तिला आर्थिक आधार म्हणून पोटगी देण्याचे किंवा महिन्याला ठराविक रक्कम देण्याचे आदेश न्यायालयामार्फत दिले जाता. पण असे आदेश विवाहित पुरुषांसोबत संबंध ठेणाऱ्या महिलांसंदर्भातील प्रकरणात देता येत नाही असं आता न्यायालायने स्पष्ट केलंय.

## पुण्यात प्रभाग २३ मध्ये मनसेच्या उमेदवाराची मुसंडी

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचा उद्या शेवटचा दिवस असल्याने सध्या शहरात राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. सर्वच पक्षांच्या नेत्यांनी आणि उमेदवारांनी मतदारांना आकर्षित करण्यासाठी आपली पूर्ण ताकद अंतिम टप्प्यात झोकली आहे. पुण्यात प्रामुख्याने राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप यांच्यात थेट लढत पाहायला मिळत असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वत: पुण्यात तळ ठोकला आहे. तर दुसरीकडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांच्या जाहीरनाम्यावर शेलक्या भाषेत टीका केल्याने महायुती आणि महाविकास आघाडीमधील संघर्ष टोकाला पोहोचला आहे.

अशातच शहरात शिवसेना (उद्धव ठाकरे गट), मनसे आणि काँग्रेस यांच्यातील युतीची चर्चा असली तरी, प्रभाग क्रमांक २३ मध्ये मात्र वेगळेच चित्र पाहायला मिळत आहे. या प्रभागात शिवसेना आणि मनसे या दोन्ही पक्षांनी आपले स्वतंत्र उमेदवार रिंगणात उतरवल्यामुळे ही लढत अत्यंत प्रतिष्ठेची आणि चुरशीची बनली आहे.

या चौरंगी लढतीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार प्रल्हाद गवळी यांनी प्रचारात मोठी मुसंडी मारल्याचे चित्र दिसत आहे. विशेषत: रविवार पेठ, गणेश पेठ आणि भवानी पेठ या दाट लोकवस्तीच्या भागात गवळी यांनी गेल्या काही काळात केलेल्या कामांमुळे त्यांना स्थानिकांचा मोठा पाठिंबा मिळत आहे.

## मागील काही वर्षांत अत्याचार वाढला, एमआयएम नेते अकबर ओवैसी यांचा गंभीर आरोप



**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :** मोदी पंतप्रधान झाल्यापासून काय काय होत आहे, लव्ह जिहादच्या नावाने किती मारले गेलेत ते तुम्ही विसरलात का? मॉब लिंचिंगमध्ये मारले गेलेले तुम्ही विसरलात, अशा भाषेत एमआयएम नेते अकबर ओवैसी यांनी मुस्लिम समाजातील लोकांना चिथावणी दिलीय. उठा आणि जाऊन लढा असे सांगत नाही, घोषणाही द्या असेही सांगत नाही. एक व्हा, ही वेळ एकत्र होण्याची आहे. हा वेळ लांब जाण्याचा नाही. दुश्मन पूर्ण तयारीने येत आहे. आताही समजणार नसेल तर संपवून जाल. भाजपाच्या बुलडोजरने घर पाडले, त्याचा काही अंदाज आहे. आज आम्ही उठलो नाही तर कधीच नाही उठणार, अशी भावनिक साद अकबर ओवैसी यांनी घातली.

सर्वात कमी शिक्षण मुस्लिम समाजाचे : मुसलमान असल्याचा गर्व आहे. आज सरकारी योजनांमध्ये मुस्लिमांची जागा किती आहे. सर्वात कमी शिक्षण मुस्लिम समाजाचे आहे. डॉक्टर, वकील, शास्त्रज्ञ सर्वच ठिकाणी शेवटी मुस्लिम आहेत. हा अन्याय नाही का? प्रत्येक सरकारने आम्हाला मागे ठेवण्याचे काम केले. ना शिक्षण, ना रोजगार मिळाला, यापेक्षा आणखी काय अन्याय असेल, त्यामुळे या विरोधात आम्ही आवाज उठवत आहोत. आज आम्हाला साधी कारकूनची देखील नोकरी मिळत नाही. देशात आम्हाला हिस्सा दिला असता तर एमआयएमला देशात प्रत्येक ठिकाणी जाण्याची गरज नव्हती. आम्हाला अंधारात ठेवले असा आरोप अकबर ओवैसी यांनी केले. व्होट बँक म्हणून आमचा वापर केला : फक्त व्होट बँक म्हणून आमचा वापर करण्यात आलाय, मुस्लिम बांधवांचं दु:ख सांगण्यासाठी आलो आहोत. तुम्हाला लोकसभेच्या जागा हरल्याचं दु:ख नाही, जलील जिंकल्यावर लोक म्हणत होते की जलील कसे जिंकले, पण हा विजय तुमच्या आशीर्वादामुळे झाला होता. आम्ही लोकसभा जागा हरलो आणि आता तुम्हाला औरंगाबादच्या महापौरपदसुद्धा हरायचं आहे. तुम्हाला आपला भाऊ महापौर बनताना पाहायचे नाही का? अन्यथा औरंगाबादचे नाव बदलणारे महापौर बनून जातील, अशी टीका भाजपा - शिवसेनेवर अकबर ओवैसी यांनी केलीय.

## पाकिस्तानकडून सीमेवर पुन्हा कारवाया; ड्रोनच्या माध्यमातून रेकी केल्याचा संशय, भारतीय सैन्य अलर्ट मोडवर!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या वर्षी पाकिस्तानमधून आलेल्या दहशतवाद्यांनी पहलगाम येथे केलेल्या भीषण नरसंहारावर आंतरराष्ट्रीय स्तरावरून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. भारतीय लष्करानं 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून पाकिस्तानला सडेतोड प्रत्युत्तर देऊन अद्दल घडवली. यानंतर भारतानं व्यापार, क्रीडा, कला अशा अनेक क्षेत्रांत पाकिस्तानवर बहिष्कार टाकणारी भूमिका घेतल्यानंतर दोन्ही देशांमधील संबंध अधिकच चिघळले असताना पाकिस्तान मात्र सुधरण्याचं नाव घेत नाहीये. एकीकडे भारतात राजकीय घडामोडी चालू असताना पाकिस्ताननं पुन्हा एकदा सीमेवर कारवाया करायला सुरुवात केली आहे. रविवारी संध्याकाळी पाकिस्तानच्या हद्दीतून काश्मीरमधील सांबा, राजौरी आणि पूंछ जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय सीमारेषेजवळ डोनच्या माध्यमातून रेकी केली गेल्याचा प्रकार समोर आला आहे.

आंतरराष्ट्रीय सीमेजवळ अनेक पाकिस्तानी ड्रोन घिरट्या घालत असल्याचं सीमेवर तैनात जवानांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी लागलीच कारवाई सुरू केली. भारतीय सैन्याकडून व्यापक शोधमोहीम हाती घेण्यात आली. भारतीय हद्दीत कोणत्याही प्रकारचा दारूगोळा किंवा शस्त्रास्त्रे टाकण्यात आली आहेत का? याचा तपास करण्यात आला. मात्र, असं काहीही लष्कराला आढळून आलं नाही.

ड्रोन भारतीय हद्दीत आले आणि काही वेळाने परत गेले!

सूत्रांनी दिलेल्याा माहितीनुसार हे ड्रोन आंतरराष्ट्रीय सीमेपलीकडून भारताच्या हवाई हद्दीत शिरले. भारतीय हद्दीतील काही संवेदनशील ठिकाणांवर हे ड्रोन काही काळ घिरट्या घालत होते. त्यानंतर ते पुन्हा पाकिस्तानच्या हद्दीच्या दिशेनं निघून गेले. यानंतर भारतीय लष्कर व सुरक्षा पथकांनी तातडीने पावलं उचलून संबंधित यंत्रणांना या घडामोडींची माहिती दिली. तसेच, ज्या भागात हे ड्रोन दिसले, त्या भागातील इतर लष्करी चौक्यांनाही सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले.

संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास राजौरी जिल्ह्यातील सीमाभागात हे ड्रोन दिसल्यानंतर भारतीय लष्कराकडून मध्यम व लाईट मशीन गनच्या सहाय्याने ड्रोन्सच्या दिशेनं हलक्या स्वरूपाचा गोळीबार करण्यात आला. प्रामुख्याने नौशेरा सेक्टरमधील गानिया-कलसियन गावात हा गोळीबार करण्यात आला. याचवेळी तेरयाथ भागातल्या खब्बर गावातही ड्रोनसदृष्य गोष्ट आकाशात आढळून आली. सदर वस्तू धरमसाल गावाकडून आली व भराखच्या दिशेनं निघून गेली.

अशाच प्रकारची माहिती सांबा जिल्ह्यातूनदेखील समोर आली आहे. या ठिकाणी रामगढ सेक्टरमधील चाक बाबराल गावात आकाशात काही मिनिटांसाठी ड्रोनसदृश्य गोष्ट दिसून आली. काही काळ घिरट्या घातल्यानंतर ही वस्तू पुन्हा गायब झाली. पूंछ जिल्ह्यातदेखील असाच प्रकार घडला.

यानंतर लष्कर, स्थानिक पोलीस आणि इतर सुरक्षा यंत्रांनी संयुक्तपणे शोधमोहीम राबवली. सांबा जिल्ह्यातल्या पलूरा गावात सुरक्षा पथकांनी नुकताच मोठा शस्त्रसाठा जप्त केला होता. या पार्श्वभूमीवर सदर ड्रोन दिसण्याची घटना महत्वाची मानली जात आहे.


## शब्दकोडे क्र. 61

आडवे शब्द

१. पूर्वी गाणीबातम्या ऐकण्यासाठी याचा वापर करीत ४. पराक्रमी ७. रामदासांचे प्रसिद्ध काव्य ११. खलाशी १२. कर्णभूषण १४. गोष्ट १५. केविलवाणा १६. पुसट, धूसर १७. असत्य १९. सुगरण पक्ष्याचे घरटे २२. भांडण २३. मर्यादा, अंत २५. वाडवडिलांनी कमावलेले २६. तल्लीन २७. मैत्रीण २८. पार्वती २९. किल्ला ३०. उलट, प्रतिकूल ३४. धनको ३६. मालिका, हार ३७. हनुमान ३८. समशेर ४०. काकुनी ४२. अफवा ४३. हुलगे ४५. सहाय्य ४६. विविध प्रकारचे ४७. लहान ५०. पाण्याचा नळ ५१. वायू ५३. सभा ५४. कोरडे, वैराण ५५. लेखणी ५७. आवड ५९. पाषाण ६१. दारूचा एक प्रकार ६२. वि.वा. शिरवाडकरांचे हे नाटक विशेष लोकप्रिय आहे ६४. चिंतन ६६. लक्ष्मी ६७. विषयांध ७२. धूळ, केर ७४. श्रावणात अनेकजण याची पूजा करतात ७७. सत्यवानाची बायको ७९. गुलामी ८०. कमी दर्जाचे ८१. नेमस्त

उभे शब्द

१. वाळू २. शिजवलेला भात ३. भूमी ५. हसण्याजोगे, पोरकट ६. रुदन ८. स्त्री ९. धार्मिक काव्याचा एक प्रकार १०. कथालेखक १२अ. पाकिट १५. दिवाळी १८. झाडापासून मिळणारे आरोग्यवर्धक शीतपेय २०. गोफण, बेचकी २१. कमावलेले (धन) २२. घट्ट २३. आंब्याची एक जात २४. पंढरीची पायी यात्रा २६. रामायणातील प्रसिद्ध अरण्य २७. बेचव २८. एक लोकप्रिय वाड्मायप्रकार २९. तृण ३१. कामकुचार, सुस्त ३२. अंगठ्यापासून सर्वात दूरचे बोट ३३. गगन ३५. जाडसर दळलेला गहू ३६. पीछेहाट ३९. मार्गस्थ ४०. ही साखर गुलकंदात वापरतात ४१. नवरा ४३. कपटी ४४. पक्ष्यांचा समूह ४६. आवाज ४८. मऊ ४९. पूर्वज ५०. अपुरा ५२. कोल्ह्यासारखा पशू ५३. नमस्कार ५६. यथेच्छ ५८. सार्वभौम राजा ६०. चांगले ६३. एकाग्र दृष्टी ६५. भ्रतार ६७. छळ, त्रास ६८. खरेपणा ६९. रानात पसरलेली आग ७०. मत्स्य ७१. कागदकापड कापण्याचे साधन ७२. केव्हा ७३. बेकरी मालासाठी आवश्यक पदार्थ ७५. रोटीचा एक प्रकार ७६. प्राण नेणारा देव ७८. तांबूल



### शब्दकोडे क्र. 60 चे उत्तर

आडवे उत्तर

१.देह ३.जो आवडतो सर्वांना १०.आजी ११.वरद १३.कजाग १४.महिषासुर १६.वाकडा १८.लागवड २१.वाद २२.क्षिती २३.नीर २६.गबाळा २८.पितर २९.बक ३०.समा ३१.गंमत ३२.इच्छा ३३.काडी ३४.सुर ३५.मित ३६.जिथे ३९.पर्वत ४०.गणेश ४२.अंगार ४४.मोलकरीण ४६.भारत ४७.तसा ४९.गवत ५०.वात ५१.ऋषी ५२.तपासणी ५३.मार ५४.मत ५५.हल्ली ५६.वर ५७.तंबोरा ५८.श्रुत ५९.चर ६०.कमी ६१.वाली ६२.नगरी ६४.गहाळ ६५.बारा ६६.शेगडी ६८.कातरवेळ ७१.करार ७२.आवर ७३.कव ७४.नट ७५.कारण ७६.सेनापती ७८.भंबेरी ७९.चार ८०.नवासी ८१.तोवर ८२.गज ८३.इकडे आड ८४.कर्ण ८५.कळस

उभे उत्तर

१.देवयानी २.हर ४.आकडा ५.वजा ६.डगला ७.सराव ८.नाम ९.विषाद १०.आरक्षित १२.दवा १५.हिवाळा १७.कर्ता १९.गट्टी २०.डगमगणे २२अ.तीर २४.रबडी २५.जमा २७.बात २८.पिच्छा ३०.सरपण ३२.इथे ३३.काडीमोड ३५.मितभाषी ३७.ज्या गावच्या बोरी ३८.सकवार ४०.गत ४१.शतपावली ४२.अंग ४३.रत ४५.रीत ४८.सासर ५१.ऋत ५३.मात ५४.मरगळ ५५.हमी ५७.तंगडी ५८.श्रुतिका ६०.कळकट ६१.वारा ६२.नगरसेवक ६३.चूर ६५.बारकावा ६६.शेव ६७.अवतीर्ण ६९.तरबेज ७०.वेळ ७२.आण ७३.कप ७४.नरडे ७५अ.रसिक ७७.नारळ ७८.भंग ७९.चाक ८०.नड

# मातृतीर्थ सिंदखेड राजात जिजाऊभक्तांचा जनसागर !

## राष्ट्रमाता जिजाऊंचा ४२८ वा जन्मोत्सव थाटात साजरा





**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी** : राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांचा ४२८ वा जन्मोत्सव सोहळा सोमवारी मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने जिजाऊंचे जन्मस्थान असलेल्या मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीत दर्शनासाठी सकाळपासून जनसागर लोटला होता. सकाळी ६ वाजता राजे लखुजीराव जाधव राजवाड्यातील राजमाता जिजाऊंच्या जन्मस्थानी वंशज राजे विजयसिंह जाधव, शिवाजीराव जाधव यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. तसेच केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना.प्रतापराव जाधव यांनी सपत्नीक राजमाता माँ जिजाऊ यांची महापूजा करुन अभिवादन केले.

यावेळी आमदार मनोज कायंदे, माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे, माजी शशिकांत खेडेकर, नगराध्यक्ष सौरभ तायडे यांनीही राजमाता जिजाऊ माँसाहेब यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

**सिंदखेडराजा विकास आराखडा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील – केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव**

राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेबांना अभिवादन करुन केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी प्रसारमाध्यमांशी बोलतांना सांगितले की, आज राष्ट्रमाता जिजाऊ यांचा ४२८ वा जन्मदिवस आहे. त्यानिमित्त देशभरातून जिजाऊभक्त, शिवप्रेमी जिजाऊ यांच्या जन्मस्थानी येतात. हे मातृतिर्थ सिंदखेड राजा भूमीचे वैभव आहे. या जन्मोत्सवाचा जनमानसात प्रचंड उत्साह दिसून येत आहे. त्यांच्या दर्शनाने अनेकांना नवी प्रेरणा मिळते. राज्य शासनाने सिंदखेड राजा विकास आराखडा जाहीर केला आहे. यातील कामे वेगवेगळ्या विभांगांकडे दिलेली आहेत.

या ठिकाणच्या बऱ्याच वास्तू पुरातत्व विभागाच्या अधिपत्याखाली येतात. दरवर्षी या आराखड्यातील नवीन कामे पूर्ण झालेले दिसून येते. पुरातत्व विभागाचे काम अत्यंत बारकाईने केले जात असल्यामुळे कामे पूर्ण व्हायला उशीर लागत असल्याचे स्पष्ट करत त्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून सिंदखेड राजा विकास आराखडा लवकरात लवकर पूर्ण करुन घेण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगितले.

वृत्तविशेष...

## मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड यांचा दौरा; राजगड येथे यात्रा महोत्सव आणि सत्कार समारंभास उपस्थित राहणार

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी** : राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री ना. संजय राठोड हे उद्या बुधवार दि.१४ जानेवारी रोजी जिह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत.



त्यांच्या दौऱ्यानुसार सकाळी ११.३० वाजता राजगड हेलिपॅड येथे आगमन, त्यानंतर दुपारी १२ वाजता मेहकर तालुक्यातील राजगड येथील श्री संत जयराम महाराज संस्थान येथे दर्शन घेवून भव्य यात्रा महोत्सव आणि सत्कार समारंभास उपस्थिती, दुपारी १ वाजता टेंबुरखेडा येथे दर्शन घेवून भव्य यात्रा महोत्सवास उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर माळहिवरा ता. दिग्रस जि. यवतमाळकडे रवाना होतील.

## राष्ट्रमाता माँ जिजाऊ यांना कामगार मंत्री अॅड आकाश फुंडकर यांचे अभिवादन



**बुलढाणा/प्रतिनिधी** : राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त राज्याचे कामगार मंत्री अॅड आकाश फुंडकर यांनी मातृतीर्थ सिंदखेड राजा येथील जन्मस्थळी भेट देवून अभिवादन केले.

यावेळी नगराध्यक्ष सौरभ तायडे, उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, तहसीलदार अजित दिवटे आदी मान्यवर उपस्थित होते.

## विल्सन जिमखान्याचा वाद पेटणार! विरोधानंतरही मैदानाचा ताबा जैन संघटनेला, 'आम्ही गिरगावकर' आक्रमक

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई /प्रतिनिधी** : दक्षिण मुंबईतील ऐतिहासिक विल्सन जिमखान्याच्या मैदानावरून सुरू असलेला वाद आता अधिकच पेटण्याची चिन्हे आहेत. 'आम्ही गिरगावकर' संघटनेचा तीव्र विरोध डावलून हे मैदान ३० वर्षांच्या दीर्घ करारावर 'जीतो' (जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन) या संघटनेला देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे गिरगावकरांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयानंतर आता हा लढा थेट रस्त्यावर उतरण्याची शक्यता आहे. तर, दुसरीकडे मराठी विरुद्ध जैन असा संघर्ष पुन्हा होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

प्रशासनाच्या या निर्णयाविरोधात 'आम्ही गिरगावकर' संघटना आक्रमक झाली आहे. संघटनेचे प्रतिनिधी लवकरच मुंबईच्या जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन हा निर्णय रद्द करण्याची मागणी करणार आहेत. केवळ प्रशासकीय पातळीवरच नव्हे, तर राजकीय पाठबळ मिळवण्यासाठी ही संघटना आता शिवसेना ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेणार आहे. या दोन्ही नेत्यांनी गिरगावकरांच्या बाजूने उभे राहावे, अशी विनंती संघटनेकडून केली जाणार आहे.

या प्रकरणावर बोलताना आम्ही गिरगावकर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर हा निर्णय मागे घेतला नाही, तर गिरगावकर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील. ऐतिहासिक वारसा लाभलेले हे मैदान खाजगी संस्थेच्या हाती देण्यास आमचा शेवटपर्यंत विरोध राहील, असे त्यांनी सांगितले.

मराठी-जैन वादाचा नवा अंक?

कबुतरखान्याच्या मुद्यावरून जैन समुदाय आणि मराठी भाषिक आमनेसामने आल्याची स्थिती निर्माण झाली होती. जैन समुदायाच्या आंदोलनानंतर मराठी संघटना आक्रमक झाल्या होत्या. त्यानंतर विल्सन जिमखाना मैदानाच्या मुद्यावरून आम्ही गिरगावकर संघटना आक्रमक झाली आहे. खेळाच्या मैदानावर खेळच खेळले गेले पाहिजेत. त्या जागी धार्मिक शैक्षणिक पाठशाळा चालवण्याचा प्रयत्न क्रीडा संस्कृतीला धक्का देणारा असल्याचा आरोप करण्यात आला होता. हा लढा फक्त मैदानाचा नाही हा आपल्या सांस्कृतिक, क्रीडात्मक अस्तित्वाचा लढा असल्याचे सांगण्यात आले होते.

## नाशिकमध्ये खाकी वर्दीला डाग लागला, अटकपूर्व जामिनासाठी दोघांनी मागितली दोन लाखांची लाच, गुन्हा दाखल होताच पोलीस पसार

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी** : फसवणुकीच्या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळवून देण्यासाठी कंत्राटदाराकडून दोन लाख रुपयांची लाच स्वीकारल्याचे निष्पन्न झाल्याने मुंबईनाका पोलीस ठाण्यातील दोन उपनिरीक्षकांवर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, गुन्हा दाखल होताच दोन्ही पोलीस उपनिरीक्षक पसार झाले असून, त्यांचा शोध सुरू आहे. दत्तात्रय एकनाथ गोडे (रा. शकुंतला हाइट्स, कामटवाडे रोड, सिडको) आणि अतुल भुजंगराव क्षीरसागर (रा. सिंहगड, शासकीय विश्रामगृह) अशी या संशयित उपनिरीक्षकांची नावे आहेत.

या प्रकरणात गडकरी चौकातील शासकीय विश्रामगृहाच्या उपहारगृहाचे चालक रमेश गंभीरराव आहिरे आणि त्यांचा मुलगा कल्पेश रमेश आहिरे यांनी मध्यस्थी केल्याचे उघड झाले आहे. क्षीरसागरच्या माध्यमातून गोडे याच्यापर्यंत पोहोचत, चौघांनी संगनमताने लाचेची रक्कम स्वीकारल्याचा आरोप आहे. विशेष बाब म्हणजे, ज्या मुंबईनाका पोलीस ठाण्यात हे दोन्ही उपनिरीक्षक कार्यरत आहेत, त्याच पोलीस ठाण्यात त्यांच्याविरोधात एसीबीकडून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे (एसीबी) उपअधीक्षक एकनाथ पाटील यांनी फिर्याद दिली आहे.

या प्रकरणातील मूळ तक्रारदार केतन भास्करराव पवार हा मुंबईनाका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या फसवणुकीच्या गुन्ह्यातील संशयित असून, तो व्यवसायाने कंत्राटदार आहे. अटकपूर्व जामीन मिळवून देण्यासाठी दोन लाख रुपयांची लाच मागितली जात असल्याची मागणी उपनिरीक्षकांमार्फत उपहारगृह चालक कल्पेश आहिरे याने केल्याचे तपासात समोर आले.

मात्र, केतन पवारने लाच देण्यास

## मुलीच्या जन्मानं आनंद तर दुसरीकडे बापाला अपघातानं हिरावलं; स्ट्रेचरवरील बाळंतिणीने फिरवला नवऱ्याच्या चेहऱ्यावर शेवटचा हात, मन हेलावून टाकणारं दृश्य

**सातारा /प्रतिनिधी :** भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेला जवान पत्नीच्या डिलिव्हरीसाठी सुट्टीवर गावी आला असतानाच त्यांचा अपघाती मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना साताऱ्यातील दरे येथे घडली. सिकंदराबाद-श्रीनगर येथे भारतीय सैन्य दलात सेवा बजावणारे सातारा तालुक्यातील दरे गावचे वीर जवान प्रमोद परशुराम जाधव यांचा अपघातात जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेने दरे गावासह संपूर्ण राज्यात शोककळा पसरली आहे. जाधव यांच्या घरी आनंदाचा क्षण शोकामध्ये बदलून गेला. पत्नीला प्रसूती वेदना सुरू झाल्यानंतर जवान प्रमोद जाधव यांनी तिला रुग्णालयात दाखल केले. प्रसूतीसाठी आवश्यक औषधी आणण्यासाठी ते मेडिकलकडे निघाले; पण ते परत रूग्णालयात आलेच नाहीत. रुग्णालयाकडे परत येत असताना त्यांचा अपघातात जागीच मृत्यू झाला. या मन हेलावणाऱ्या घटनेनं सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

प्रमोद जाधव यांच्या पत्नीने ऋतुजा हिने शनिवारी सकाळी एका गोंडस मुलीला जन्म दिला. तिच्या येण्याने सर्वत्र आनंद असायला हवा होता; पण त्याच वेळी कोणीतरी धाडस करून त्यांच्या पत्नीला सांगितले गेले की, तुमच्या पतीचा अपघाती मृत्यू झाला आहे. त्या माहितीनं तिची अवस्था आभाळ फाटल्यासारखी झाली.

बाळंतीण ऋतुजाला सावरण्यासाठी नर्स, गावकरी आणि नातेवाईक पुढे आले. त्यांनी तिला स्ट्रेचरवरून गावात आणलं. अवघ्या आठ तासांच्या चिमुकल्या लेकीलाही तिच्या वडिलांना अखेरचा निरोप दिला. पत्नी ऋतुजाचा स्ट्रेचर पतीच्या पार्थिवाजवळ ठेवला. थरथरत्या हाताने तिने पतीच्या चेहऱ्यावरून अखेरचा हात फिरवला. तो क्षण पाहून उपस्थितांचे मन हेलावून गेलं. तो क्षण उपस्थितांच्या डोळ्यात पाणी आणणारो होता. प्रमोद जाधव हे लेह-लडाख येथे भारतीय सैन्यात हवालदार पदावर कार्यरत होते. सातारा जिल्ह्यातील दरे येथे शनिवारी जवान प्रमोद जाधव यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आठ तासांची ओली बाळंतीण पत्नी ऋतुजाला स्ट्रेचरवरून आणले होते. हे दृश्य मन हेलावून टाकणारं होतं.

प्रमोद जाधव यांना आई नसल्याने तेच आपल्या पत्नीच्या डिलिव्हरीसाठी ते सुमारे आठ दिवसांपूर्वी सुट्टीवर गावी आले होते. दरम्यान, कामानिमित्त दुचाकीवरून वाढे फाट्याच्या दिशेने जात असताना आयशर टेम्पोने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात प्रमोद यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या पत्नीने एका गोंडस बाळाला जन्म दिला. पित्याच्या मृत्यूची बातमी आणि घरात आलेला नव्या जीवाचा आनंद, या दोन्ही गोष्टींना कुटुंबीय हादरून गेले.

अंत्ययात्रा अंत्यविधीच्या ठिकाणी पोहोचल्यानंतर प्रमोद जाधव यांची पत्नी आणि काही तासांपूर्वीच जन्मलेली चिमुकली मुलगी पित्याच्या अंत्यदर्शनासाठी आणण्यात आली होती. नवजात बालिकेने घेतलेले वडिलांचे अखेरचे दर्शन पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले, अनेकांना अश्रू अनावर झाले. शासकीय इतमामात वीर जवान प्रमोद जाधव यांना म ानवंदना देत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी प्रशासनातील अधिकारी, माजी सैनिक, ग्रामस्थ आणि नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशसेवेसाठी सदैव तत्पर असलेल्या या वीर जवानाच्या अकाली जाण्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक आपला विदर्भ**

**गजानन जाधव**

**बेलगाव :** बेलगाव येथील महादजी दर्याजी पाटील माध्यमिक विद्यालयात दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व युगप्रवर्तक स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त भव्य समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या समारंभात विद्यार्थ्यांनी राष्ट्रमाता जिजाऊंच्या वेशभूषा साकारत त्यांचे विचार प्रभावीपणे मांडले.

कल्याणी गोपाल वानखेडे, श्रेया अमोल गवळी, जान्हवी विश्वनाथ वानखेडे, रोशनी रवि राव व प्रिती राजू खंडारे या विद्यार्थिनींनी जिजाऊंच्या जीवनकार्यावर आधारित विचार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक सन्माननीय कावरखे सर यांनी राष्ट्रमाता जिजाऊंचे अंधश्रद्धा निर्मूलनासाठीचे कार्य, शेतकरी हितासाठीची भूमिका तसेच मावळ्यांप्रती असलेली त्यांची निष्ठा विद्यार्थ्यांना सविस्तरपणे समजावून सांगितली.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविताना मुख्याध्यापक दीपक कुटे सर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या "उठा, जागे व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका" या प्रेरणादायी विचारांचा उल्लेख करत विद्यार्थ्यांना एकाग्रतेने व कार्यप्रवणतेने जीवनात यशस्वी होण्याचे आवाहन केले. तसेच राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याचा आदर्श जीवनात अंगीकारण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद मेटांगळे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन एन. टी. गीते सर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक कावरखे सर, वानखेडे सर, गीते सर, मेटांगळे सर, रहाटे सर, जायभाये सर, गायकवाड सर, साखरे सर, खुशालराव मेटांगळे सर, विजय दाभाडे, पुनम वानखेडे, गजानन देशमुख तसेच सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विशेष परिश्रम घेतले.

हा समारंभ विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा जागर करणारा ठरला.

## मातृतीर्थ सिंदखेडराजा विकासाचा नवीन आराखडा तयार करणार

### पालकमंत्री मकरंद पाटील यांची माहिती; बालशिवबासह जिजाऊ पुतळ्याच्या जागेची पाहणी

**दैनिक आपला विदर्भ**

**सिंदखेडराजा/प्रतिनिधी** : राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या ४२८ व्या जयंतीनिमित्त मातृतीर्थ सिंदखेडराजा येथे पालकमंत्री ना. मकरंद पाटील आणि सहपालकमंत्री ना. संजय सावकारे यांनी जिजाऊ माँसाहेब यांच्या जन्मस्थळी नतमस्तक होऊन अभिवादन केले. यावेळी माध्यमांशी बोलताना मातृतीर्थ सिंदखेडराजा विकासासाठी नवीन आराखडा तयार करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

राजमाता जिजाऊ यांचे जन्मस्थान हे प्रेरणादायी असून या ऐतिहासिक स्थळाला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी मातृतीर्थ सिंदखेडराजा विकास आराखडा नव्याने तयार करून शासनस्तरावर मंजुरीसाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.






या दौऱ्यादरम्यान पालकमंत्री मकरंद पाटील यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्ग वरील सिंदखेडराजा इंटरचेंज फेज क्रमांक ७ येथे उभारण्यात येणाऱ्या बालशिवबासह राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या पुतळ्याच्या प्रस्तावित जागेची पाहणी केली.

याप्रसंगी आमदार मनोज कायदे, नगराध्यक्ष सौरभ तायडे, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, एॅड नाझेर काझी सातारा जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष नितीन भरगुडे पाटील, पुणे विभागीयअधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष हरीश पाटणे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.